सराफ चौधरी नगर को-ऑप. हौसिंग सोसायटीज् असोसिएशन लि.

नोंदणी क्रमांक : एमयुएम / एमएचएडीबी / जीईएन / ओ / १३५२३ / २०२२-२०२३ दिनांक : १५ / ०३ / २०२३

अ/०६, ५१-५३, सराफ चौधरी नगर, ठाकूर संकुल, कांदिवली (पूर्व), मुंबई - ४०० १०१

संदर्भ क्र. : SCN Assoc./१२२ /२०२६ दिनांक : ~~१८/१०/२०२६~~

प्रति,
श्री./ श्रीमती सर्व कार्यकारिणी समिती व उपसमिती सदस्य.

सराफ चौधरी नगर को-ऑप.हौसिंग सोसायटीज असोसिएशन ली.
महोदय

सराफ चौधरी नगर को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटीज असोसिएशन लि. या संस्थेच्या कार्यकारिणी समिती / उपसमिती सदस्य तसेच सर्व १४ संस्थांचे कार्यकारी समिती सदस्य यांना कळविण्यात येते कि, असोसिएशनने विकासकांचे प्राप्त १० निविदांमधून १)M/s. Runwal Developers Ltd. २)M/s. Kanakia Homes Pvt. Ltd. ३)M/s. Kalpataru Ltd. ४)M/s. H.Rishabraj हे छाननी केलेले (Shortlisted) चार विकासकांचे सादरीकरण (Presentation) व प्रश्नोत्तरे बहुउद्देशीय सभागृह येथे ठेवण्यात आलेले आहे. सादरीकरणाचे (Presentation) वेळापत्रक खालील प्रमाणे.

	विकासकाचे नाव	तारीख	वेळ
१)	M/s. Runwal Developers Ltd.	२४/१०/२०२६	दुपारी ०२:०० वा. ते ४:४५ वा.
२)	M/s. Kanakia Homes Pvt. Ltd.	२४/१०/२०२६	सायंकाळी ०५:०० वा. ते ०७:४५ वा.
३)	M/s. Kalpataru Ltd.	२५/१०/२०२६	सकाळी १०:०० वा. ते १२:४५ वा.
४)	M/s. H. Rishabraj	२५/१०/२०२६	दुपारी ०२:०० वा. ते ०४:४५ वा.

तसेच असोसिएशनचे सर्व १४ सभासद संस्थांचे सदनिकाधारक व दुकान गाळेधारक सभासदांना विकासकांचे सादरीकरण (Presentation) प्रक्रिया पाहणेकरिता त्या-त्या संस्थेच्या अध्यक्ष / सचिव यांचेमार्फत Youtube live streaming Link देण्यात येईल. तरी असोसिएशनचे परिपत्रक क्र. २८ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सभासदांनी त्यांच्या सूचना/प्रश्न त्या-त्या संस्थेच्या पदाधीकारी / प्रतिनिधींमार्फत मांडाव्यात.

तरी सन्मानीय समिती सदस्यांनी सादरीकरण व प्रश्नोत्तरे करिता वेळेवर उपस्थित रहावे हि विनंती.

आपले विश्वासू

अध्यक्ष / ~~सचिव~~
सराफ चौधरी नगर को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटीज असोसिएशन लि.

टीप :-

१) फक्त असोसिएशनचे कार्यकारिणी समिती व उपसमिती सदस्य तसेच सर्व १४ सभासद संस्थांचे कार्यकारिणी समिती सदस्यांनाच सभेस उपस्थित राहता येईल.